## स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक:- ०७/११/२०१८

# मालेगाव शहरातील मोमीनपुरा परिसरात गावठी पिस्टल बाळगणारे ०२ इसम स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

---

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण तसेच गुन्हेगारीस प्रतिबंध होणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी सत्वर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाची धडक कारवाई सुरू आहे. मालेगाव शहरातील मोमीनपुरा परिसरात अवैधरित्या अग्निशस्त्रे (गावठी पिस्टल) बाळगणारे ०२ संशयीतांना स्थागुशाचे पथकाने ताब्यात घेतले आहे.

दिनांक ०६ नोव्हेंबर २०१८ रोजी ऑलआऊट रात्रगस्त स्किम दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरात मालाविरूध्दचे गुन्हयातील सराईत गुन्हेगारांचा शोध घेत असतांना खब-यामार्फत मिळालेल्या गुप्तबातमी नुसार, मालेगाव शहरातील मोमीनपुरा परिसरात काही संशयीत इसम हे अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगुन गुन्हा करण्याचे तयारीत असल्याचे खात्रीशीर रित्या समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने मोमीनपुरा परिसरात सापळा रचुन संशयीत **इसम नामे १) मोहम्मद शोएब शौकत हुसेन,** वय २२, रा. मोमीनपुरा, एकतारा बिल्डींग, मालेगाव, **२) मोईन मोहम्मद अनिस, वय २४,** रा. अख्तराबाद, मालेगाव यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमांचे कब्जातुन **एक देशी बनावटीचे पिस्टल** व एक होण्डा शाईन मोटर सायकल हस्तगत करण्यात आली. सदर इसमांकडे चौकशी करता त्यांचेकडे कोणताही शस्त्र परवाना मिळुन आला नाही, तसेच सदरचे पिस्टल हे त्यांचा मित्र नामे शहजाद डी पुर्ण नाव माहित नाही, रा. मिल्लत मदरसा जवळ, मालेगाव याचेकडुन घेतले असलेबाबत समजले असुन स्थागुशाचे पथक त्याचा शोध घेत आहे. सदर इसम हे विनापरवाना बेकायदेशीररित्या घातक अग्निशस्त्र कब्जात बाळगतांना मिळुन आले असुन त्यांचेविरूध्द **मालेगाव शहर पोलीस ठाणेस** ॥ गुन्हा रजि. नं. ८७/२०१८ **भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो,** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. नीलोत्पल सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे**, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुहास छत्रे, राकेश उबाळे, देवा गोविंद, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने मालेगाव शहरातील अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणारे ०२ इसामांना ताब्यात घेवुन सदर कारवाई केली आहे.